# प्रकरण पहिले

## संशोधनाची समस्या व स्वरूप

# प्रकरण पहिले

## संशोधनाची समस्या व स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात संशोधनाची गरज व महत्व, शिक्षकाचे शिक्षण प्रक्रियेतील स्थान व त्याचे प्रशिक्षण, दर्जा कोणी वाढवावयाचा, समस्या विधान, समस्येचे कथन, गृहीतके, उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संबंधित संशोधनाच्या साहित्याचा अभ्यास यांचा समावेश केला आहे.

1.1. संशोधनाची गरज व महत्व :

भारतीय शिक्षणमंचावर दूर / मुक्त शिक्षण हे औपचारिक शिक्षणाचा महत्वपूर्ण, परिणामकारक व अर्थपूर्ण पर्याय म्हणून चांगलेच मूळ धरू लागले आहे. संधीवंचितांना शिक्षणाची संधी व सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने ते महत्वाचे आहे.

महत्वपूर्ण पर्याय म्हणून गरजेतूनच त्याचा स्वीकार करावा लागतो. **निरक्षरता** हा तिस-या जगातील देशांमधील ज्वलंत प्रश्न आहे. शैक्षणिक धोरणांची स्वीकृती व कार्यवाही करूनही शिक्षणातील संधीच्या समानतेचे उद्दिष्ट आपण गाठू शकलो नाही. लोकसंख्येचा प्रस्फोट हा साक्षरतेच्या मार्गातील प्रमुख अडथळा आहे. विसाव्या शतकाच्या शेवटी जगाची लोकसंख्या सात अब्ज एवढी होईल. भारताची लोकसंख्या शंभर कोटी एवढी होईल. सध्या साक्षरता 52.11 प्रतिशत एवढी आहे. म्हणजे दोन व्यक्तींपैकी एक व्यक्ती अशिक्षित आहे. निरक्षर स्त्रियांची संख्या 190 दशलक्ष असून ती पुरूष निरक्षरांहून सत्तर दशलक्षने अधिक आहे. तसेच गळतीचे प्रमाणही अधिक आहे. उपलब्ध आकडेवारीवरून पाचव्या इयत्तेत जाईपर्यंत ते अठ्ठयाहत्तर प्रतिशत इतके असते तर इयत्ता आठवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करेपर्यंत हे

प्रमाण चौ-याऐंशी प्रतिशत इतके आहे. या गळतीचे रूपांतर नंतर निरक्षरतेत होते. या प्रवाहात बदल झाला नाही तर जागतिक बँकेच्या अंदाजानुसार इ. स. 2000 मध्ये जगाच्या निरक्षरांच्या निम्मे निरक्षर भारतात असतील.

भविष्यकाळात शिक्षणाच्या विविध स्तरांवरील विशेषत: प्राथमिक स्तरावरील शिक्षणाची मागणी वाढणार आहे. शिक्षणाच्या वाढत्या मागणीमुळे शिक्षक, सुविधांची मागणी वाढणार आहे. त्यामुळे आर्थिक, शैक्षणिक आणि प्रशासकीय समस्या निर्माण होणार आहेत.

औपचारिक शिक्षणाची सुविधा अल्प गटापुरती व आर्थिक सुस्थितीत असणा-यांनाच उपलब्ध झाली आहे. या सुविधेमुळे उच्चभ्रू व संधीवंचित असे वर्ग निर्माण झाले आहेत. संधीवंचितात ग्रामीण, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांचा समावेश होतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (1986) ही असमानता दूर करण्यावर भर देण्यात आला असून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, ग्रामीण भाग, मुली यांना समता आणि सामाजिक न्याय मिळवून देण्याचा असेल तर त्यांना मिळणा-या शिक्षणसोयीतील असमानता लवकरात लवकर दूर केली पाहिजे असे नमूद केले आहे. हे संधीवंचित घरी कराव्या लागणा-या कामामुळेही औपचारिक शिक्षण प्रवाहात येत नाहीत. म्हणून मुक्त शिक्षण हा शक्यतो कमी खर्चाचा आणि लवचिक पर्याय आहे.

मुक्त **शिक्षणाला** वेगवेगळया देशात, वेगळया संदर्भात वेगवेगळी नावे आहेत. ती मुक्त शिक्षण, पत्रद्वारा शिक्षण, बाहय अभ्यास, off campus study अशी होत. गेल्या दोन दशकात भारतासह तिस-या जगातील देशांवर या शिक्षण पद्धतीचा **जाणवण्याइतपत** प्रभाव पडला आहे. हे मुक्त शिक्षणाचे कार्यक्रम **पाच** प्रकारचे असतात.

भारतात शिक्षणमंचावरील मुक्त आणि दूर शिक्षण **पाच** प्रकारचे आहे.

1. माध्यमिक स्तरावर शालेय शिक्षण मंडळाकडून चालविले जाणारे पत्रद्वारा अभ्यासक्रम.
2. पारंपरिक विद्यापीठाकडून पदवी पातळीपर्यंत चालविले जाणारे पत्रद्वारा अभ्यासक्रम.
3. मुक्त शाळांतर्फे चालविले जाणारे दूर शिक्षण कार्यक्रम.
4. मुक्त विद्यापीठाद्वारे चालविले जाणारे दूरशिक्षण कार्यक्रम.
5. प्राथमिक, माध्यमिक, पदवी व प्रौढ शिक्षणाच्या औपचारिक शिक्षणाला पूरक असे दूरदर्शन व आकाशवाणीचे शैक्षणिक कार्यक्रम.

राष्ट्रीय पातळीवरील 20 सप्टेंबर 1983 मध्ये संसदेच्या कायद्यानुसार स्थापना झालेले इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ ही सर्वोच्च यंत्रणा आहे. या विद्यापीठाची जी अकरा उद्दिष्टे दिली आहेत त्यामध्ये आठवे उद्दिष्ट **शिक्षकाच्या** प्रशिक्षणासंबंधी आहे.

To provide or arrange training of teachers required for such activities or institutions. [1]

1.2. शिक्षकाचे शिक्षण प्रक्रियेतील स्थान व त्याचे प्रशिक्षण :

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे महत्वपूर्ण साधन आहे. शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील अतिशय महत्वाचा घटक आहे. शिक्षकाशिवाय शिक्षणाचा विचार करणे म्हणजे डेन्मार्कच्या राजपुत्राशिवाय हॅम्लेट नाटकाचा प्रयोग करण्यासारखे आहे. भारताचे भवितव्य त्यांच्या वर्गातून घडविले जात आहे.

The destiny of India is being shaped in its class-rooms. या शिक्षण आयोगाच्या ( 1964-66 ) सुरूवातीच्या वाक्यावरून भारताचे भवितव्य घडविणारा **शिक्षक** हा एक महत्वपूर्ण घटक आहे. पुढे आयोगाने असे म्हटले आहे की,

"Of all different factors which influence the quality of education and its contribution to the national development, the quality, competence and character of teacher are the most significant." [2]

माध्यमिक शिक्षण आयोग ( 1952-53 ) च्या मते,

We are however convinced that the most important factor in the contemplated educational reconstruction is the teacher, his personal qualities and his educational qualifications, his professional training and the place he occupies in school as well in school as well as in community. Priority considerations should be given to the various problems connected with their status. [3]

शिक्षकांचा व्यावसायिक दर्जा किंवा विकास होण्यासाठी त्याला मिळणारे प्रशिक्षण हे अतिशय महत्वाचे आहे. शिक्षकाचा व्यावसायकि दर्जा हा त्याला मिळणा-या गुणवत्तापूर्ण प्रशिक्षणावर अवलंबून असतो. शिक्षण आयोगाच्या ( 1964-66 ' मते,

The efficiency of the teaching profession and its contribution to national development in general and educational improvement in particular, will largely depends on its social status and morale. This will in its turn depend upon two interrelated factors : economic status of the teachers and their

professional competence, character and sense of dedication. Through out the world the experience has been that, as material rewards of **teachers** are elevated, it becomes possible to recruit in the **profession** individuals of **continually** improving quality and with more **extended** professional training and in proportion as the competency, integrity and dedication has increased, society has been increasingly willing - and justifiably so - to give greater recognition to their material and economic status.[4]

## 1.3. व्यावसायिक दर्जा कोणी वाढवावयाचा ?

शिक्षकाला त्याचा व्यावसायिक दर्जा उंचावला तर एकविसाव्या शतकाला सामोरा जाणारा नागरिक तो निर्माण करू शकेल. **शिक्षिकाला** .... एकविसाव्या शतकाची शिक्षणाची आव्हाने . पेलावयाची आहेत आणि एकविसाव्या शतकाची आव्हाने पेलणारा नागरिक शिक्षकाला निर्माण करावयाचा आहे. राष्ट्राचा दर्जा वाढवावयाचा आहे.

The quality of Nation depends upon the quality of its citizen, quality of citizen depends upon the quality of Education, quality of education depends upon quality of teachers and quality of teachers depend upon quality teachers education.

हा दर्जा कोणी वाढवावयाचा ?

असे म्हणतात की,

Status cannot be bought, borrowed or legislated.

शिक्षकांनी स्वतःच आपला दर्जा वाढविला पाहिजे. शिक्षण प्रक्रियेतील निष्काम कर्मयोगी शिक्षकाने भगवत्गीतेतील सुवचन लक्षात ठेवावे.

उद्धरेत् आत्मनो आत्मानाम् ।

( Raise your Status by thyself )

## 1.4. समस्या विधान :

" शिक्षकाचा व्यावसायिक दर्जा वाढविण्यासाठी महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने ' ज्ञानगंगा घरोघरी ' [illegible] ' या आपल्या दूरशिक्षणाच्या विविध उपक्रमांद्वारे शिक्षकाला प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या.

बी. एड्. अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्याचा अभ्यास करण्याचे संशोधिकेने ठरविले.

" मुक्त विद्यापीठाच्या बी. एड्. शिक्षणक्रमाचा समीक्षात्मक अभ्यास. "

## 1.5. समस्या कथन :

मुक्त विद्यापीठाचा हा अभ्यासक्रम योग्य आहे का ? तो पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळतो का ? विद्यापीठाने तयार केलेल्या अध्ययन पुस्तिकांचा दर्जा कसा आहे ? अभ्यास पूर्ण करताना कोणत्या अडचणी येतात ? स्वाध्याय, गृहपाठ, प्रात्यक्षिकाद्वारे पुरेसे प्रत्याभरण मिळते का ? मानसशास्त्रीय प्रयोगांचा अध्यापनात उपयोग होतो का ? बी. एड्. अभ्यासक्रम कालावधी पुरेसा आहे का ? विद्यार्थ्यांना येणा-या अडचणी सोडविण्यासाठी कोणते उपाय सुचविता येतील ?

या सर्व प्रश्नांचा समीक्षात्मक अभ्यास संशोधिकेने केला आहे.

1.6. गृहीतके :

1. मुक्त विद्यापीठामार्फत बी. एड्. व एम्. एड्. चे अभ्यासक्रम विविध महाविद्यालयात राबविले जातात.
2. बी. एड्. विद्यार्थ्यांना ( प्रशिक्षणार्थींना ) स्वयंअध्ययनासाठी साहित्य पुरविले जाते.
3. प्रशिक्षणार्थी व प्राध्यापक या पुस्तिकांचा अध्ययन - अध्यापनात वापर करतात.
4. अभ्यासक्रमावर आधारित प्रात्यक्षिक कार्य अभ्यासकेंद्रावर पूर्ण करून घेतले जाते.
5. प्रत्येक मार्गदर्शन केंद्रावर तीन संपकसत्रे आयोजित केली जातात.

1.7. संशोधनाची उद्दिष्टे :

1. दूरशिक्षण बी. एड्. शिक्षणक्रमासाठी असणा-या अभ्यासक्रमाचा परिचय करून घेणे. रूपरेषा अभ्यासणे.
2. दूरशिक्षण बी. एड्. अभ्यासक्रमाच्या कालवधीचा विचार करणे.
3. विद्यापीठाकडून पुरविलेल्या संदर्भ साहित्य संबंधीच्या प्रतिक्रिया जाणून घेणे.
4. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिकासंबंधी प्रतिक्रिया आजमावणे.
5. अभ्यासक्रम पूर्ण करताना येणा-या अडचणींचा शोध घेणे.

1.8 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधनाचा विषय, उद्दिष्टे व गृहीतके या दृष्टीने संशोधनाची पुढीलप्रमाणे व्याप्ती व मर्यादा निश्चित केली आहे.

सदरचे संशोधन मुक्त विद्यापीठाच्या सातारा केंद्रातील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमधील राबविल्या जाणा-या बी. एड्. अभ्यासक्रमाच्या संदर्भात निश्चित केले आहे.

सदरच्या संशोधनात विद्यापीठाकडून पुरविलेल्या साहित्य, पुस्तिका, अभ्यासक्रम व अभ्यासक्रमाचा **कालखंड यावर लक्ष** केंद्रित केले आहे.

1.9 संज्ञांचा अर्थ :

मुक्त विद्यापीठ : उच्च शिक्षणापासून संधीवंचित असलेल्यांना बहिस्थ वा पत्रद्वारा शिक्षण देणारी वैधानिक विद्यापीठीय यंत्रणा.

बी. एड्. शिक्षणक्रम : प्रशिक्षणासाठी विद्यापीठाने मान्य केलेला अधिकृत अभ्यासक्रम.

अभ्यासक्रम : शिक्षणाची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता जे संस्कारयुक्त अनुभवांचे आयोजन म्हणजे अभ्यासक्रम.

1.10.1. संबंधित संशोधन साहित्याचा अभ्यास :

निवडलेल्या समस्येच्या संदर्भात झालेल्या संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे.

संशोधिकेने संशोधनासाठी . विषय निश्चित केल्यावर त्यात त्या विषयाशी संबंधित असलेल्या संशोधनाचा अभ्यास करणे आवश्यक असते. संशोधनासाठी वापरावयाची पद्धती ठरविणे, उपयुक्त साधनांची निवड करणे, प्रतिसादकांची निश्चिती करणे, माहिती मिळविण्यासाठी आधार निश्चित करणे, संकलित केलेल्या गुणात्मक व संख्यात्मक माहितीचे **विशदीकरण** करणे इत्यादीबाबत योग्य पार्श्वभूमी संबंधित **साहित्याच्या** अभ्यासातून मिळते.

पूर्वीच्या संशोधनाचे क्षेत्र, साधने, माहिती आणि तिचे विशदीकरण, निष्कर्ष, सूचना, यांची दखल **घेवून**

त्या गोष्टींची पुनरावृत्ती होणार नाही. या दृष्टीने विषय निश्चित करण्यासाठी संबंधित संशोधनाचा आढावा घेणे आवश्यक ठरते. तसेच संशोधनाची विविध क्षेत्रे समजतात, दुर्लक्षित राहिलेल्या संशोधन क्षेत्रांचाही अंदाज संबंधित साहित्याचा अभ्यास केल्याने करता येतो. संशोधिकेने निवडलेल्या समस्येच्या संदर्भात संबंधित संशोधनाचा अभ्यास केला.

भारतातील दूरशिक्षण आणि मुक्त शिक्षण हे गरजावर आधारित आणि परिणामकारक शिक्षण प्रकार म्हणून विकसित होत आहे. राष्ट्रीय स्तरावरील मुक्त शाळा व राष्ट्रीय व राज्य स्तरावरील मुक्त विद्यापीठे ही वेगवेगळया प्रकारचा अभ्यासक्रम राबवित आहेत. हे अभ्यासक्रम प्रचलित औपचारिक शालेय व विद्यापीठीय शिक्षणाबरोबरच मुक्त शिक्षणाला वरदानच आहे. तथापि मुक्त आणि दूरशिक्षण या विषयावर केलेल्या संशोधनाचा यापूर्वीच्या कोणत्याही संशोधन सर्वेक्षणामध्ये समावेश केलेला नाही. असे पाचव्या शैक्षणिक सर्वेक्षण ( 1988-92 ) भाग - 1 मध्ये पृष्ठ 516 वर नमूद करण्यात आले आहे.

यापूर्वीच्या संशोधन सर्वेक्षणात या क्षेत्रातील संशोधनाचा समावेश सर्वसाधारण विभाग व शैक्षणिक तंत्रज्ञान, शिक्षक प्रशिक्षण, अनौपचारिक शिक्षण अथवा उच्च शिक्षण या स्थूल क्षेत्रात करण्यात आला आहे. मुक्त शिक्षण आणि दूर शिक्षणाच्या संशोधनाने 1980 मध्ये गती घेतली. विद्यावाचस्पती पदवीसाठी केलेले संशोधन, वैयक्तिकरित्या व शैक्षणिक संस्थांनी केलेले संशोधन अहवालांचा या क्षेत्रातील संशोधनाच्या सर्वेक्षणामध्ये समावेश होतो. हे संशोधन खालील सात प्रकारांमध्ये समाविष्ट होते.

1. नोंद, प्रवाह, आणि अभ्यासक्रम.
2. दूरशिक्षण पद्धती वाढ, विकास, आणि सामाजिक संदर्भ.
3. दूरशिक्षण गरज, वैशिष्टये.
4. अभ्यासक्रम साहित्य निर्मिती व विकास.
5. अध्यापन पद्धती व तंत्रे.

6. दूरशिक्षणाचे अर्थशास्त्र.

7. मूल्यमापन अभ्यास.

या सात प्रकारात झालेल्या संशोधनाची सहासष्ट शीर्षके पाचव्या शैक्षणिक संशोधन (1988-92) भाग - 1 पृष्ठ 536-540[5] मध्ये दिली आहेत. त्यापैकी फक्त चार शिक्षक प्रशिक्षणाशी संबंधित आहेत.

1. खान निलोफर (1991) इफेक्टिव्हिटी ऑफ डिस्टन्स एज्युकेशन प्रोग्रॅम विथ रेफरन्स टू टीचर्स ट्रेनिंग प्रोग्रॅम कोर्स, काश्मीर विद्यापीठ, पीएच्. डी. ( शिक्षणशास्त्र ), काश्मीर युनिव्हर्सिटी.
2. उप्रेटी, डी. सी. ( 1988 ), इम्पॅक्ट ऑफ टीचर ट्रेनिंग थ्रू करसपॉन्डस् कोर्स ( बी. एड्. एस्एस्सीसीसी ) ऑन अपवर्ड ऑक्क्युपेशनल मोबिलिटी ऑफ एलिमेंटरी टीचर इन वेस्टर्न रिजन. इंडिपेन्डन्ट स्टडी, भोपाळ रिजनल कॉलेज ऑफ एज्युकेशन.
3. नागराजू सी. एस्. ( 1982 ), इव्हॅल्युएशन कम. करसपॉन्डन्स् कम कॉन्टॅक्ट इन सर्व्हिस टीचर ट्रेनिंग प्रोग्रॅम इन केरळ, इन्स्टिटयूट ऑफ सोशल ॲन्ड इकॉनॉमिक चेंज, बेंगलोर ( मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया फिनान्सड् रिसर्च ).
4. पुगाजहेन्थी, जी. ( 1991 ), ए स्टडी ऑफ टीचर एज्युकेशन प्रोग्रॅम थ्रू दि करसपॉन्डन्स् सिस्टीम इन मदुराई कामराज युनिव्हर्सिटी, पीएच्. डी. एज्युकेशन, दि महाराजा सयाजीराव युनिव्हर्सिटी ऑफ बरोडा.

गेल्या दोन दशकातील दूरशिक्षण व मुक्त शिक्षणाचा संख्यात्मक विकास आणि प्रवाह या संबधीचा जो आढावा घेण्यात आलेला आहे, त्या संशोधनाचे विश्लेषण केले तर त्या वरून काही निष्कर्ष निघतात. ते खालीलप्रमाणे.

1. दूरशिक्षण व मुक्त शिक्षणाच्या संशोधनाची 1970 च्या दशकात फारशी प्रगती झालेली दिसत नाही. 1980 च्या दशकात जेव्हा विद्यापीठे आणि संस्थांनी पत्राद्वारे अभ्यासक्रम

सुरू केले तेव्हा प्रगतीला गती आली. बहुसंख्य संशोधने वर्णनात्मक असून विद्यार्थी प्रवेशकल, औपचारिक शिक्षण आणि दूरशिक्षण यातील प्रगतीच्या तुलनेपुरते मर्यादित आहेत. दूरशिक्षण विद्यार्थ्यांच्या गरजा, त्यांची वैशिष्टये, गळती, अध्यापन साहित्य निर्मिती, स्वाध्याय पूर्तता, अभ्यासकेंद्राचा दर्जा, वैयक्तिक मार्गदर्शन कार्यक्रमांचे नियोजन आणि अर्थव्यवस्था अशा प्रश्नांचाही अभ्यास अलगपणे करण्यात आला. पण अनुधावनाचा अभाव आढळतो.

2. बहुतांशी संशोधन हे मानसशास्त्र, अध्यापन, माध्यमिक, माहिती तंत्रज्ञान इ. चलांच्या एकत्रिकरणावर आधारलेले आहे. पण भारतातील मुक्त शिक्षण पद्धती व कार्यवाही यांच्याशी फारसा संबंध नसलेले आहे. संशोधनात दूरदृष्टी आणि भविष्यकालीन नियोजनाचा अभाव आढळतो.

3. संशोधनाच्या कार्यपद्धतीवरून असे दिसून येते की, बहुसंख्य संशोधनात वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धती व संख्यात्मकविश्लेषण तंत्रांचा वापर केला आहे. व्यक्तीअभ्यास, प्रायोगिक पद्धती व गुणात्मक विश्लेषण तंत्रांचा वापर केलेला नाही.

4. दूरशिक्षण कार्यक्रमांचा विकास, मूल्यमापन व त्यांचा परिणाम यावर अभ्यास झालेला नाही.

5. दूरशिक्षण अभ्यासावरून असे दिसून येते की, शालेय स्तर व तृतीय स्तर ( पदवीस्तर ) या दोन पातळयांवर दोन प्रकारे ते दिले जाते.

   1. राज्यातील शालेय शिक्षण मंडळे व प्रचलित विद्यापीठे यांच्यामार्फत चालविले जाणारे पत्रद्वारा अभ्यासक्रम .

2. मुक्त शाळांमार्फत चालविले जाणारे शालेय स्तरावरील व विद्यापीठामार्फत चालविले जाणारे पदवी व पदव्युत्तर स्तरांवरील दूरशिक्षण अभ्यासक्रम.

6. संशोधनाच्या माहितीवरून असे दिसून येते की, पत्राद्वारे अभ्यासक्रमाचा

   1. ज्यांना शालेय शिक्षण मिळाले नाही, त्यांना शालेय शिक्षण.
   2. कामगार (मजूर), स्त्रिया, संधीवंचित आणि अती दूर भागात राहणा-यांना उच्च शिक्षणाची संधी मिळते.

शालेय स्तरावरील व पदवी पातळीवर नोंद करणा-यांची वाढ झाली आहे. मात्र प्रत्येक ठिकाणी झालेल्या नोंदीत फरक आढळतो. परिसराच्या गरजा, विभागीय व देशाच्या सामाजिक, आर्थिक व मनुष्यबळाच्या गरजा लक्षात न घेता पत्राद्वारा व मुक्त शिक्षण देणा-या संस्थांची ( केंद्राची ) स्थापना झालेली आहे.

7. पत्रद्वारा व मुक्त शिक्षण देणा-या केद्रांनी औपचारिक शिक्षण देणा-या शाळा, विद्यापीठे यांच्यावरील ताण कमी केला आहे. तथापि पत्रद्वारा व मुक्त शिक्षण हे दुय्यम दर्जाचे शिक्षण समजले जाते.

8. पत्रद्वारा आणि दूरशिक्षण हे मुख्यतः भाषा, सामाजिक शास्त्रे यांच्यापुरते मर्यादित राहिले आहे. व्यावसायिक अभ्यासक्रम अतिशय मर्यादित असून ते पदविका किंवा प्रमाणपत्रापुरतेच मर्यादित आहेत. पत्राद्वारे विज्ञान शिक्षणाचे अभ्यासक्रम मर्यादित आहेत.

9. आर्थिक दृष्टीने विचार केला तर दूरशिक्षण हे औपचारिक आणि पारंपरिक शिक्षणाच्या तुलनेत परवडणारे आहे. तथापि, पत्रद्वारा शिक्षण ही औपचारिक शिक्षणाचीच पातळ ( डायल्यूट ) आवृत्ती असून प्रवेश आणि परीक्षा याबाबतीत तितकीच ताठर आहे.

10. पत्राद्वारे / दूरशिक्षणाचे अभ्यासक्रमसाहित्य गडबडीत आणि गुणवत्तेचा विचार न करता केले जाते. तथापि, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे अभ्यासक्रम मनुष्यबळ

गरजांचा विचार करून सुरू केले जातात. व्यावसायिक तज्ज्ञांच्या समावेशामुळे गुणवत्ताही राखली आहे. दूरशिक्षण घेणा-यांशी होणारा पत्रव्यवहार व स्वाध्याय मूल्यमापनाच्या बंधनाकडे बहुसंख्य केंद्रांनी दुर्लक्ष केलेले दिसते. तथापि, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने आयोजित केलेले वैयक्तिक संपर्क कार्यक्रम दूरस्थ विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडविण्यात परिणामकारक ठरले आहेत.

11. दूरशिक्षण केंद्रे मुख्यतः छापील साहित्याचा वापर करतात. समूहसंपर्क साधनांचा वापर करीत नाहीत. तथापि, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अध्यापनासाठी अत्याधुनिक संपर्कसाधने आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करते.

12. बहुसंख्य दूरशिक्षण संस्थात विद्यार्थी मदतसेवा ( स्टुडन्टस् सपोर्ट सर्व्हिसेस ) ~~अस्त...~~ अस्तित्वात नाहीत. तथापि इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ देशभर विभागीय केंद्राचे जाळेच निर्माण करून ही सुविधा परिणामकारकरित्या पुरविते. या प्रयत्नामुळे राज्यातील व केंद्रशासित प्रदेशातील विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यात विद्यापीठ यशस्वी ठरले आहे.

13. बहुसंख्य दूरशिक्षण संस्थांनी विद्याशाखा विकास कार्यक्रमांना फारसे महत्व दिलेले नाही. उच्च पातळीवरील संघटनेच्या अभावामुळे त्यांनी दर्जा राखण्याकडे दुर्लक्ष केले आहे. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने दूरशिक्षण परिषदेद्वारे ( डिस्टन्स एज्युकेशन कौन्सिल ) देशातील दूरशिक्षण देणा-या संस्थातील दर्जा राखण्यासाठी प्रभावी उपाययोजना केल्या आहेत. राज्यांतील मुक्त विद्यापीठांनी कर्मचारी विकास, नियोजन व व्यवस्थापनासाठी पावले उचलली असून त्यासाठी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाचे मार्गदर्शन, मदत घेतली असून राष्ट्रीय मुक्त विद्यापीठांच्या सुविधांचा वापर करतात.

1.10.2. संशोधनाच्या गरजा :

दूरशिक्षण आणि पत्रद्वारा शिक्षण हे शैक्षणिक विकासात महत्वपूर्ण भूमिका पार पाडीत असले तरी त्यात प्रशिक्षित माणसांची उणीव आहे. तसेच शालेय व विद्यापीठ पातळयांवर नियोजन करण्यासाठी संबंधित उपयुक्त सामग्रीची उणीव अधिक आहे. सर्वदूर शिक्षणाच्या कार्यक्रमांचे नियोजन व कार्यवाही गृहीतके आणि अंतर्ज्ञानाने घेतलेल्या निर्णयावरून केली जाते. असे निर्णय दूरक्षिक्षणाच्या प्रत्येक घटकाबाबत घेतले जातात. त्यामध्ये विद्यार्थ्यांची नोंद व माहिती, नफा तोटा, विद्यार्थ्यांच्या गरजा व वैशिष्टये, समुपदेशन व स्वाध्याय संबंधी विद्यार्थ्यांच्या अपेक्षा, विद्यार्थी मदत सेवा ( केंद्राचे कामकाज, विकास, दृक-श्राव्य साधनांची निवड व वापर व छापील मजकुरांचे नमुने ) तसेच दूरशिक्षणाच्या कार्याशी निगडीत व परिणाम करणा-या महत्वपूर्ण गोष्टींचा समावेश होतो. म्हणून खालील गोष्टींवर संशोधनाची गरज आहे.

1. दूरशिक्षण पद्धती निर्मिती व कार्यवाहीशी निगडीत असणा-या घटकांशी संबंधित ज्ञान निर्मिती.
2. भावी संशोधकांना दूरशिक्षणात काम करणा-यांच्या ज्ञानाचा उपयोग करून देणे.
3. दूरशिक्षण ज्ञानाशाखा म्हणून विकसित करण्यासाठी मदत करणे.
4. देशातील दूरशिक्षण समाजाचे मनोधैर्य उंचावणे आणि दूरशिक्षण क्षेत्राकडे बुद्धिवंतांना आकर्षित करणे.
5. दूरशिक्षणाची धोरणे ठरविणा-यांना दूरशिक्षणाचे खरे ( यथार्थ ) चित्र पुरविणे की जेणेकरून अधिकाधिक उच्च शिक्षण घेऊ इच्छिणा-यांना योग्य व माफक दरात गुणवत्तापूर्ण शिक्षण घेता येईल.

हे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळ व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांनी काही संशोधन प्रकल्पांना साहाय्य करावे त्यामुळे औपचारिक / पारंपरिक आणि दूर / मुक्त पद्धती एकत्र येतील व मुक्त शिक्षण घेणा-यांना लवचिक पद्धतीचे फायदे मिळावेत आणि पारंपरिक पद्धतीची विश्वसनीयता मिळावी.

दूर आणि मुक्त शिक्षणातील संशोधन अजूनही बाल्यावस्थेत आहे. संशोधकही संशोधन समस्या निवडताना दूर शिक्षण विकासाला उपयुक्त ठरतील अशा समस्या निवडीत नाहीत म्हणून या उदयोन्मुख क्षेत्रातील संशोधन सैद्धांतिक व प्रात्यक्षिक ठरविण्यासाठी दूर शिक्षणाला उपयुक्त ठरत नाही. म्हणून या संशोधन क्षेत्रातील प्राध्यान्य क्षेत्रे ठरविणे अतिशय महत्वाचे आहे. या दृष्टीने संशोधकांना खालील क्षेत्रे उपयुक्त ठरतील. त्याकडे ताबडतोबीने लक्ष देणे आवश्यक आहे.

1. संधीवंचित तसेच वेगवेगळे लक्ष्य गटांच्या गरजा लक्षात घेऊन सर्वसमावेशक सर्वेक्षणाद्वारे शैक्षणिक व व्यावसायिक अभ्यासक्रम ठरवणे.
2. अभ्यासक्रमसाहित्य विकास व प्रयोग व अनुधावनाद्वारे त्याची परिणामकारकता पाहाणे.
3. प्रायोगिक व रेखांशात्मक अभ्यासाद्वारे विकसित केलेल्या प्रतिमानांचा वापर करणारे शिक्षक, प्रशासक व इतर साहाय्यक सेवकांना दूरशिक्षणासंबंधी उजाळा व प्रशिक्षण ही प्रतिमाने अनुलेखन, तपासणी , व्यक्तिसंपर्क कार्यक्रमांचे नियोजन, **स्वाध्याय** . तपासणी, माध्यम निर्मिती, संप्रेषण तंत्र, संगणकाचा वापर, कार्यालय व्यवस्था, दृक-श्राव्य कार्यक्रम निर्मिती, प्रात्यक्षिक तपासणी **यापुरतेच मर्यादित असावी.**
4. विद्यार्थी मदतसेवा वृद्धी, वितरण व्यवस्था सुधारणा, प्रशासनाचे विकेंद्रीकरण, आदान-प्रदान पद्धतीचा विस्तार यांचा अभ्यास होण्याची गरज असून या अभ्यासासाठी प्रायोगिक आणि व्यक्ती अभ्यासतंत्राचा वापर व्हावा.
5. दूरस्थ अभ्यासकाच्या मूल्यमापनासाठी प्रायोगिक अभ्यासाद्वारे विकासात्मक व एकात्म प्रतिमानांचा विकास.
6. बहुसंख्य विकसित देशात उच्च पातळीवर व संस्था पातळीवर ' क्वालिटी ॲश्यूरन्स ॲक्टिव्हिटी ' योजनेचा वापर केला जातो. तसा भारतात पारंपरिक आणि मुक्त विद्यापीठाने शैक्षणिक संस्थांच्या शैक्षणिक दर्जाची खात्री पटविण्याच्या योजना राबविण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत.

7. दूर / मुक्त शिक्षणाचा संस्था पातळीवर होणारा खर्च यांचा अभ्यास होण्याची गरज आहे.

8. नियोजन, पद्धती, प्रक्रिया, अध्ययन फलनिष्पत्ती, सामाजिक, आर्थिक लक्ष्य गट यावर होणा-या दूर / मुक्त शिक्षणाच्या परिणामाचा मूल्यमापनात्मक अभ्यास. भावी नियोजन व धोरण या दृष्टीने अत्यावश्यक आहे.

मुक्त शिक्षणाच्या क्षेत्रात वरील संशोधनाच्या गरजांचा विचार केल्यानंतर संशोधिकेने निवडलेला ' मुक्त विद्यापीठाच्या बी. एड्. शिक्षणक्रमाचा समीक्षात्मक अभ्यास ' मुक्त शिक्षणाच्या विशेषतः बी. एड्. च्या प्रशिक्षण कार्यक्रमाशी संबंधित विद्यार्थी-शिक्षक, प्राध्यापक, केंद्रप्रमुख, समन्वयक, यांच्या प्रतिक्रियांचा अभ्यास हा सर्वसमावेशक अभ्यास असून क्षेत्रावर काम करणा-या प्रतिसादकांकडून खरेखुरे प्रत्याभरण मिळणार असल्याने दूरशिक्षणाच्या प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमात गुणवत्तात्मक सुधारणा होण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्वाचे असून संशोधन विषय नवीन व मौलिक आहे.

## संदर्भ

1. फिप-थ सर्व्हे ऑफ एज्युकेशनल रिसर्च, ( 1988-92 ) भाग - 1. ( एन्. सी. ई. आर्. टी. पब्लिकेशन डिव्हिजन ), 1997, पृ. 514.

2. रिपोर्ट ऑफ दि एज्युकेशन कमिशन, ( दिल्ली - पब्लिकेशन डिव्हिजन, मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, 1964-66 ), पृ. 46.

3. रिपोर्ट ऑफ दि सेकंड एज्युकेशन कमिशन, ( दिल्ली, पब्लिकेशन डिव्हिजन, मिनिस्ट्ररी ऑफ एज्युकेशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, 1953 ), पृ. 163.

4. रिपोर्ट ऑफ दि एज्युकेशन कमिशन, उपरोक्त. पृ. 145

5. फिप-थ सर्व्हे ऑफ एज्युकेशन ( 1988 - 92 ) भाग - 1, उपरोक्त पृ.पृ. 536 - 40.